# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

**Dr. Priya Gedam**
**Director (I/C)**
**(Department of Students'Devolopment**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : nssdsw.gug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/DSD / 541/2018** **Date31/10/2017**

प्रति,

मा. प्राचार्य / विभाग प्रमुख,
सर्व सलग्नीत महाविद्यालये व विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय : 'कमवा व शिका' योजना राबविणेबाबत.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाच्या कक्षेत उच्च शिक्षणाचा अंतर्भाव असल्याने विद्यार्थ्याला अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढ्यापूरता मर्यादित न ठेवता त्याला संस्कृतिने वाढवावे, उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यावर श्रमसंस्कार व्हावेत व त्याने हा ठेवा निरंतर जपावा या हेतूने सत्र २०१५–१६ पासून **'कमवा व शिका योजना'** सुरु करण्यात आली आहे. याबाबतची सविस्तर माहिती, नियमावली व विहित प्रस्ताव नमूना संलग्न केले आहे.

खालील संलग्नित यादीतील महाविद्यालयांच्या मा. प्राचार्यांकडून सदरहु प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी प्रस्ताव अपेक्षित आहेत. करीता आपणांस आपल्या महाविद्यालयामध्ये सदरहु कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने **दि. ३० नोव्हेंबर २०१८** पर्यंत संचालक विद्यार्थी विकास विभाग गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कार्यालयास प्रस्ताव सादर करावा, हि विनंती.

धन्यवाद!

(डॉ. प्रिया गेडाम)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

सहपत्रे – नियमावली व प्रस्ताव नमूना.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
## विद्यार्थी विकास विभाग
## कमवा आणि शिका योजना नियमावली

**प्रस्तावना:—**

महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाच्या कक्षेत उच्च शिक्षणाचा अंतर्भाव असल्याने विद्यार्थ्याला अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढयापुरते मर्यादित न ठेवता, त्याला संस्कृतीने वाढवावे हा शिक्षणाचा मुळ दृष्टीकोन आहे. उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांवर श्रम संस्काराचाही वर्षाव व्हावा, त्यांनी हा ठेवा निरंतन जपावा या उदात्त हेतूने कमवा आणि शिका योजना गोंडवाना विद्यापीठाने सुरु केलेली आहे.

**योजनेची उद्दीष्टे:—**

१. आर्थिकदृष्टया दुर्बल, गरजू आणि होतकरु विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण संपादन करण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे.
२. मानवी श्रमाची प्रतिष्ठा जोपासणे.
३. स्वयं रोजगाराच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे.
४. ज्ञान सेवक (Knowledge Servant ) बनविणे.
५. श्रम संस्कृतीची ( Work Culture) जाणीव निर्माण करणे.
६. विविध प्रकारची कामे करुन मिळणाऱ्या अनुभवाचा लाभ विद्यार्थ्यांना या योजने अंतर्गत होवू शकेल.

**योजनेकरिता पात्रता:—**

ही योजना गोंडवाना विद्यापीठाशी संलग्रित असलेली विविध महाविद्यालये व विविध पदव्युत्तर शैक्षणिक विभागांमधुन पदवी अथवा पदव्युत्तर वर्गात उच्च शिक्षण घेणाऱ्या नियमित (Regular) विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी लागू राहील. या योजनेची अंमलबजावणी संबंधीत संलग्न महाविद्यालयामार्फत करण्यात येईल तथापी महाविद्यालयास ''कमवा आणि शिका'' योजना कार्यान्वित करण्यासाठी विद्यापीठाची मान्यता घेणे दरवर्षी अनिवार्य असेल. जी महाविद्यालये सरदहु योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचा योग्य वापर करुन, योजना प्रभावीपणे राबवतील अशा महाविद्यालयांना पूढील वर्षी प्राधान्य देण्यात येईल.

**अर्ज करण्याची पद्धत:—**

१. सदर योजना महाविद्यालयात/विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागात राबविण्यास मान्यता देण्याबाबतचे अधिकार मा. संचालक विद्यार्थी विकास यांना राहतील.
२. मान्यता प्राप्त करण्यासाठी विहीत नमुन्यात 'संचालक विद्यार्थी विकास' यांचे कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रस्ताव मा. संचालक यांच्याकडे दि. ३० सप्टेंबर पुर्वी सादर करणे अनिवार्य आहे. त्यानंतर आलेल्या प्रस्तावांचा सदर योजना राबविण्यासाठी विचार केला जाणार नाही.
३. विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील गडचिरोली व चंद्रपूर या दोन्ही जिल्हयातील संलग्न महाविद्यालयाकडून आलेल्या प्रस्तावांची छाननी करुन नियमानुसार महाविद्यालयाची सदर योजना राबवावयाची आहे.
४. तद्नंतर महाविद्यालयाला मान्यता पत्र पाठविण्यात येईल. मान्यता प्राप्त महाविद्यालयांनीच ही योजना राबवावयाची आहे.

## 'अ' योजनेची अंमलबजावणी :—

''कमवा आणि शिका'' या योजनेच्या प्रवेशा संदर्भातील सुचना महाविद्यालयाच्या सुचनाफलकावर लावून तसेच प्रत्येक वर्गामध्ये सूचना देवून विहीत नमून्यात अर्ज सादर करण्यासाठी आवाहन करावे.

१. विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची छानणी करणे.
२. महाविद्यालयातील सल्लागार समिती मार्फत विद्यार्थ्यांच्या निवड करणे.
३. सल्लागार समितीचा निर्णय अंतिम राहील.
४. समितीद्वारे निवड केलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीची एक प्रत मा. संचालक विद्यार्थी विकास यांचेकडे पाठविणे अनिवार्य आहे.
५. महाविद्याल स्तरावर जास्तीत जास्त १० विद्यार्थी व विद्यापीठ, पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील जास्तीत जास्त ४० विद्यार्थ्यांचा समावेश असावा.

## 'ब' योजने अंतर्गत करावयाची कामे:—

या योजनेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी खालील नमूद केलेली कामे करावीत. परंतू स्थानिक परिस्थितीनुसार सल्लागार समितीच्या मान्यतेने इतरही कामांचा समावेश महाविद्यालयाची गरज लक्षात घेवून करता येईल.

(१) **कार्यालयीन कामे:—** प्रशासकीय विभाग, ग्रंथालय, प्रयोगशाळा व अन्य विभागातील कामे, इत्यादी.
(२) **तांत्रिक कामे:—** संगणकावरील कामे, झेरॉक्स मशीन, टेलिफोन बूथ चालविणे, इत्यादी.
(३) **फील्ड वर्क:—** बागेची निगा राखणे, परिसरातील झाडांची निगा राखणे, खेळांची मैदाने तयार करणे व त्याची निगा राखणे, परिसर स्वच्छता करणे, गांडुळखत प्रकल्प राबवविणे, नर्सरी युनिट तयार करणे, इत्यादी.

## 'क' कामाचे तास:—

(१) विद्यार्थ्याला आठवडयातुन चार दिवस प्रत्येकी फक्त एक (०१) तास कार्यालयीन/तांत्रिक काम देता येईल.
(२) ज्या दिवशी कार्यालयात सुट्टी असेल, त्या दिवशी कार्यालयीन काम बंद असेल व हजेरी पत्रकावर विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीची नोंद घेण्यात येईल.
(३) विद्यार्थ्याला फक्त एक (०१) तास फील्ड वर्क देता येईल. कार्यालयाला सुट्टी असेल त्या दिवशीही फील्ड वर्क करता येईल.

## 'ड' कामाचा दर व (मानधन) देण्याची पद्धत:—

(१) या योजनेतील काम करणाऱ्या विद्यार्थ्याला त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला म्हणून कामाच्या प्रती तासाला रु. ३०/— या प्रमाणे मानधन देण्यात यावे. यामध्ये कोणताही परस्पर बदल करु नये.
(२) विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने विद्यार्थ्यांना द्यावयाच्या मानधनात कोणताही बदल/सुधारणा केल्यास महाविद्यालयांना कळविण्यात येईल.
(३) विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाच्या एकुण तासाची गणना करुन त्याला देय असलेली मानधनाची एकुण रक्कम धनादेशाद्वारे विद्यार्थ्याच्या बॅक खात्यावर जमा करण्यात यावी.
(४) धनादेश दिल्यानंतर विद्यार्थ्याच्या नावासमोर हजेरी पत्रकावर धनादेश क्रमांक नमुद करावा व धनादेश मिळाल्याची विद्यार्थ्याची स्वाक्षरी घ्यावी. ही योजना राबविणाऱ्या महाविद्यालयाने या योजनेकरिता स्वतंत्र बॅक खाते उघडणे आहे व ते खाते 'प्राचार्य आणि विद्यार्थी विकास अधिकारी' यांचे संयुक्त स्वाक्षरीने चालविण्यात यावे.
(५) कमवा व शिका या योजनेचे प्राप्त प्रस्तावास मा. कुलगुरू, महोदय यांची मान्यता मिळाल्या नंतर सदरहु योजनेचे रक्कम अग्रीम स्वरूपात देण्यात येईल तथापी सदरहु योजना राबविल्या नंतर त्यांचे सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेली उपयोगीता प्रमाणपत्र व विद्यार्थ्यांचे हजेरीपत्रकासह १० मार्च पर्यत सादर करणे आवश्यक आहे.

## 'इ' हजेरी पत्रक:—

(१) सदर योजनेमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या यादीनुसार विद्यार्थ्यांचे मासिक हजेरीपत्रक तयार करावे.

(२) हजेरीपत्रक विद्यापीठाने दिलेल्या विहीत नमुन्याप्रमाणेच असावे.

(३) हजेरीपत्रकामध्ये प्रत्येक दिवशी काम केल्याचे एकुण तास, कामाचा मोबदला कामाचे स्वरुप व स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.

(४) गैरहजर असलेल्या **'X'** चिन्ह असावे.

(५) हजेरी पत्रकावर कोठेही उपस्थिती अथवा अनुपस्थितीबाबत अनुक्रमे **P** किंवा **A** नमुद केलेले नसावे.

(६) हजेरी पत्रकाच्या खाली विद्यार्थी विकास अधिकारी व प्राचार्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

## 'फ' वार्षिक हिशेब सादर करण्याची पद्धत :—

(१) प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या ऑगस्ट ते फेब्रुवारीच्या अखेरपर्यंत ही योजना महाविद्यालयाने राबवावी.

(२) या योजनेचे सर्व हिशेब शैक्षणिक वर्षाच्या १० मार्च पर्यत पुर्ण करावेत. या कालमर्यादेची कृपया नोंद घ्यावी.

(३) हिशेब तपासणीच्या वेळी खालील कागदपत्रे सादर करावे.

अ) कमवा व शिका योजनेच्या चालु शैक्षणिक वर्षातील मान्यतापत्राची प्रत.

ब) कामाचा तपशिलवार वार्षिक अहवाल.

क) योजनेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह.

ड) विद्यार्थ्यांचे मासिक हजेरीपट.

ई) विद्यार्थ्यांची मानधन दिलेली देयके, धनादेश क्रमांकासह, महाविद्यालयाचे बॅक पासबुक

फ) खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र व विवरणपत्रांवर सनदी लेखापाल, विद्यार्थी विकास अधिकारी व प्राचार्य यांची स्वाक्षरी व शिका आवश्यक आहे.

## अन्य नियम :

(१) जे विद्यार्थी गरीब परंतु हुशार व होतकरु आहेत अशा विद्यार्थ्यांना या योजनेत प्रवेश द्यावा.

(२) सदरहु योजना फेब्रुवारी महिन्यापर्यंतच राहील व नंतर पून्हा नविन वर्षात ०१ ऑगस्ट नंतर सुरु होईल.

(३) विद्यार्थ्यांची निवड सल्लागार समिती करेल व समितीचा निर्णय बंधनकारक राहील.

(४) विद्यार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु १,००,०००/— पेक्षा जास्त नसावे.

(५) ज्या विद्यार्थ्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती किंवा तत्सम शिष्यवृत्ती राज्य शासनाकडुन मिळते अशा विद्यार्थ्यांनी प्राधान्य देण्यात येवू नये. अशा विद्यार्थ्यांना जागा रिक्त असल्यास सल्लागार समितीच्या निर्णयानुसार प्रवेश द्यावा.

(६) परीक्षा कालावधीत सदरहु योजना राबविल्या जानार नाहीत.

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

## विद्यार्थी विकास विभाग

### महाविद्यालयीन स्तरावरील कमवा आणि शिका योजना २० —२०        साठी (प्रस्ताव)

१. महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ............................................................................................................................................................................................................................

२. महाविद्यालय स्थापनेचे वर्ष : ............................................................................

अनुदानित / विनाअनुदानित: ............................................................................

३. प्राचार्य नाव व: ............................................................................

संपर्क क्र. (मोबाईल) : ............................................................................

४. विद्यार्थी विकास अधिकारी नाव : ............................................................................

संपर्क क्र. (मोबाईल) : ............................................................................

५. विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्यास मान्यमा घेतलेली आहे का? : होय......... नाही ............

६. घेतलेली असल्यास कालावधी नमूद करावा : शै. वर्ष ............... ते शै. वर्ष ...........
(मान्यता पत्राची छायांकित प्रत जोडावी)

७. महाविद्यालयातील विद्यार्थी — संख्या :—

८.

| पदवी | | | पदव्युत्तर | | |
|---|---|---|---|---|---|
| मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| | | | | | |
| | | | | | |

९. महाविद्यालयातील प्राध्यापकांची संख्या : ............................................................................

१०. महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवकांची संख्या : ............................................................................

१०. महाविद्यालयाचा परिसर : क्षेत्रफळ : ............... इमारतींची संख्या:................. ......
प्रयोगशाळा : .......................... उद्यानाचे क्षेत्रफळ : ...........कार्यशाळा.. ............

# सल्लागार समिती सदस्यांची नावे :

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य | —अध्यक्ष .................................... |
| २. | संस्था चालकांचे प्रतिनिधी | —सदस्य .................................... |
| ३. | विद्यार्थी विकास अधिकारी | —सचिव .................................... |
| ४. | प्राध्यापिका प्रतिनिधी | —सदस्य .................................... |
| ५. | रासेयो कार्यक्रम अधिकारी | —सदस्य .................................... |
| ६. | राष्ट्रीय छात्रसेना अधिकारी असल्यास | —सदस्य .................................... |
| ७. | शारीरिक शिक्षण संचालक | —सदस्य .................................... |
| ८. | विद्यार्थीनी प्रतिनिधी (विद्यार्थी परिषदेचे सचिव | —सदस्य .................................... |
| ९. | विद्यार्थी प्रतिनिधी | —सदस्य .................................... |
| १०. | महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी | —सदस्य .................................... |
| ११. | स्थानिक समाजसेवक | —सदस्य .................................... |

१२. सन २० —२० या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातर्फे कोणते उपक्रम सदर योजनेअंतर्गत राबविता येतील, या संबंधीच्या आराखडा : ..........................................
..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................
.......................................................

(टीप — विद्यार्थी विकास अधिकारी यांची मान्यता घेतलेली नसल्यास मा.प्राचार्यांनी / मा. संचालकांनी याबाबत स्वतंत्रपणे पत्र पाठवून ३ वर्षाकरिता मान्यता घेणे आवश्यक आहे.)

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थी विकास अधिकारी (D.S.D.)<br>स्वाक्षरी व शिक्का | महाविद्यालयाचा<br>शिक्का | प्राचार्य<br>स्वाक्षरी व शिक्का |

# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

**Dr. Priya Gedam**
**Director (I/C)**
**(Department of Students'Devolopment**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** nssdsw.gug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/DSD /541 /2018** **Dt:31/10/2018**

प्रति,

मा. प्राचार्य / विभाग प्रमुख,
सर्व सलग्नीत महाविद्यालये व विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय : ''व्यक्तिमत्व विकास योजना'' राबविणेबाबत.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, केवळ पुस्तकी व बौध्दिक शिक्षणावर विद्यापीठामध्ये भर न देता समाजसेवा व शिक्षणेत्तर उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन व्यक्तिमत्व विकास साधता यावा या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लाभ शिक्षणापासून वंचित झालेल्या अन्य घटकांनाही मिळावा तसेच अधिक संस्कारक्षम, सक्षम, ध्येयवादी, सेवाभावी व जिवनमुल्यांना जोपासणारी विद्यार्थी पिढी निर्माण व्हावी या हेतुने **'व्यक्तिमत्व विकास योजना'** सत्र २०१५–१६ पासून विद्यापीठाने सुरु केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती, नियमावली व प्रस्ताव नमूना संलग्न केले आहे.

उपरोक्त महाविद्यालयांच्या मा. प्राचार्यांकडून सदरहु प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी प्रस्ताव अपेक्षित आहे. करीता आपणांस आपल्या महाविद्यालयामध्ये सदरहु कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने **दि. ३० नोव्हेंबर २०१८** पर्यंत संचालक विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कार्यालयास प्रस्ताव सादर करावा, हि विनंती.

धन्यवाद!

(डॉ. प्रिया गेडाम)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

सहपत्रे — नियमावली व प्रस्ताव नमूना.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
## विद्यार्थी विकास विभाग
## व्यक्तिमत्व विकास योजना नियमावली

१. प्रस्तावना:—

केवळ पुस्तकी व बौध्दिक शिक्षणावर विद्यापीठामध्ये भर न देता समाजसेवा व शिक्षणेत्तर उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करुन त्यांचा व्यक्तिमत्व विकास साधता यावा. त्याच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ शिक्षणापासून वंचित असलेल्या अन्य घटकांनाही मिळावा तसेच अधिक संस्कारक्षम, सक्षम, ध्येयवादी, सेवाभावी व जीवनमूल्यांना जोपासणारी विद्यार्थी पिढी निर्माण व्हावी यासाठी ही योजना आहे.

२. उद्दिष्टे :—

१. विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास करणे.
२. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.
३. जीवनमूल्ये रुजविण्याचा प्रयत्न करणे.
४. विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी आरोग्य, कयदे, संस्कृती, संगणक, माहिती तंत्रज्ञान, कौशल्य विकास कार्यक्रमाद्वारे मार्गदर्शन करणे.
५. शिक्षणेत्तर कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे.
६. स्वयंरोजगाराच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.

**३. योजनेसाठी पात्रता :—**

या योजनेमध्ये गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमधून उच्च शिक्षण घेत असलेले विद्यार्थी सहभागी होवू शकतात. सदर योजना राबविण्यासाठी महाविद्यालयांना विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाकडून मान्यता घ्यावी लागेल.

**४. योजनेसाठी अनूदान :**

महाविद्यालयाने पाठविलेल्या प्रस्तावास विद्यापीठाकडून योजनेची मान्यता घेवून अंमलबजावणी करावी लागेल. या योजनेकरीता जास्तीत जास्त रु. १०,०००/— अनुदान देय राहील.

**५. अर्ज करण्याची पध्दत :**

या योजनेच्या मान्यताप्राप्तीसाठी महाविद्यालयानी सोबत जोडलेल्या नमुन्यातील अर्जासह प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावा. सदरचा प्रस्ताव मा. संचालक विद्यार्थी विकास, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या कार्यालयाकडे पाठवावा. प्रस्तावासोबत आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता

करावी. प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षात ३० सप्टेंबर ही अंतिम मुदत असेल. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना मान्यता देता येणार नाही.

## ६. योजनेसाठी मान्यता :—

विद्यार्थी विकास विभागाद्वारा प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावाची छाननी करुन मार्गदर्शक तत्वांच्या आधारे मा. कुलगुरुंनी मान्यता दिलेले प्रस्ताव या योजनेसाठी पात्र ठरतील. अपूर्ण अवस्थेत असलेल्या प्राप्त प्रस्तावांना मान्यता दिली जाणार जाही.

## ७. योजनेसाठी कार्यवाही :—

सदर योजनेची कार्यवाही महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास समितीमार्फत करण्यात येईल. या योजनेच्या माध्यमातून शिबीरे, चर्चासत्र, कार्यशाळा, कृतिसत्रे यांचे आयोजन करण्यात यावे. आरोग्य, शिक्षण, शारीरिक, मानसिक आरोग्याची माहिती, स्वंयरोजगाराची माहिती, व्यक्तिमत्व विकास, स्त्रीपुरुष समानता, योग शिक्षण, पर्यावरण जागृती, कौशल्य विकास, राष्ट्रीय एकात्मता इत्यादी विषयांवर मार्गदर्शनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करावे.

## ८. आर्थिक तरतुद :—

कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत संगणक जागृती, आय.सी.टी. जागृती कार्यशाळांचे महाविद्यालयाने आयोजन करावे अशी अपेक्षा आहे. या कार्यशाळेकरीता तज्ज्ञ मार्गदर्शक तयार करण्याकरीता प्रशिक्षकांचे प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठ करील. एका महाविद्यालयातील दोन प्राध्यापकांना या कार्याशाळेमध्ये प्रशिक्षण घ्यावे लागेल.

विद्यार्थ्यांसाठी १ आठवडा कालावधीकरीता अनिवासी कार्यशाळा महाविद्यालयाने आयोजित करावी. (प्रति दिवस कमीत कमी ३ तास व दोन तासिका घेणे अनिवार्य) यामध्ये एका तज्ज्ञ व्यक्तीचे मानधन जास्तीत जास्त रु. ३००/-- देण्यात यावे. या योजनेंतर्गत महाविद्यालयास जास्तीत जास्त रु. १०,०००/— अनुदान देय राहील

कार्यशाळा आयोजनाकरीता किंवा उपक्रमांना संचालक विद्यार्थी विकास यांची मान्यता असणे आवश्यक आहे. सोबतच्या विहीत नमुन्यातील अर्जाद्वारे प्रस्ताव सादर करणे आवश्यक असून मान्यता मिळाल्यानंतरच कार्यक्रमांचे आयोजन करावे. फेब्रुवारी महिन्या अखेरपर्यंत ही योजना राबविता येईल. कार्यक्रम आयोजनाकरीता आलेल्या खर्चाचा हिशेब त्या वर्षाच्या १० मार्च पर्यत सादर केल्यानंतरच धनादेशाद्वारे खर्चाची पूर्तता करण्यात येईल.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## विद्यार्थी विकास विभाग,

## व्यक्तिमत्व विकास योजना, २०  — २०   साठी प्रस्ताव

१. महाविद्यालयाचे नांव व पत्ता : ..............................................................................

..............................................................................................................

२. महाविद्यालयाचे स्थापनेचे वर्ष : ...........................................................................

३. प्राचार्यांचे नाव : ...............................................................................................

४. विद्यार्थी विकास अधिकाऱ्याचे नाव व मोबाईल क्र. : ................................................

५. महाविद्यालयातील एकूण प्राध्यापकांची संख्या : ..........................................................

६. महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी संख्या : ...............................................................

७. महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संख्या : ......................................... ..........

८. व्यक्तिमत्व विकास योजनेसाठी सल्लागार उपसमिती सदस्यांची नांवे :

१) ............................................. : प्राचार्य, पदसिध्द अध्यक्ष

२) ............................................. : ........................................................

३) ............................................. : ........................................................

४) ............................................. : ........................................................

५) ............................................. : ........................................................

९. महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांसाठी कोणकोणते ज्ञानविस्तार कार्यक्रम राबिवले जातात ?

१)..............................................................................................................

२)..............................................................................................................

१०.चालु शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातर्फे कोणते उपक्रम सदर योजनेअंतर्गत राबविता येतील यासंबंधीच्या कार्यक्रमाचा आराखडा.

१)..............................................................................................................

२)..............................................................................................................

११.व्यक्तिमत्व विकास योजनेच्या वतीने कोणते उपक्रम घ्यावेत याविषयी सूचना :

..............................................................................................................................

..............................................................................................................................

..............................................................................................................................

..............................................................................................................................

१२.खर्चाचे अंदाजपत्रक स्वतंत्ररित्या सादर करावे.

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थी विकास अधिकारी (D.S.D.)<br>स्वाक्षरी व शिक्का | महाविद्यालयाचा<br>शिक्का | प्राचार्य<br>स्वाक्षरी व शिक्का |

# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

**Dr. Priya Gedam**
**Director (I/C)**
**(Department of Students'Devolopment**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** nssdsw.gug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/DSD /541 /2018** **Dt:31/10/2018**

प्रति,

मा. प्राचार्य / विभाग प्रमुख,
सर्व सलग्नीत महाविद्यालये व विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय : 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यक्रम राबविणेबाबत.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, आपल्या देशात भूकंप, दुष्काळ, अवर्षण, दंगल, चक्रीवादळे, औद्योगिक अपघात त्सुनामी, आग या आपत्तींची वारंवारता वाढली आहे. यासाठी जनजागृती करण्याचे काम आवश्यक आहे, हा विचार करुन सत्र २०१५–१६ पासून 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यक्रम विद्यापीठाने सुरु केला आहे. याबाबतची सविस्तर माहिती, नियमावली व प्रस्ताव नमूना संलग्न केले आहे.

विविध महाविद्यालयांकडून सदरहु प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी प्रस्ताव अपेक्षित आहे. करीता आपणांस आपल्या महाविद्यालयामध्ये सदरहु कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने **दि. ३० नोव्हेंबर २०१८** पर्यंत संचालक विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कार्यालयास प्रस्ताव सादर करावा, हि विनंती.

धन्यवाद!

(डॉ. प्रिया गेडाम)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

सहपत्रे – नियमावली व प्रस्ताव नमूना

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## विद्यार्थी विकास विभाग

## आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण नियमावली

प्रस्तावना :—

आपत्तीमुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन महत्वाचे आहे. आपल्या देशात भूकंप, दुष्काळ, अवर्षण, दंगल, चक्रीवादळे, औद्योगिक अपघात, सुनामी लाटा, आग या आपत्तींची वारंवारता वाढली आहे. यासाठी जनजागृती करण्याचे काम आवश्यक आहे. हा विचार करुन गोंडवाना विद्यापीठाने आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्याचे निश्चित केले आहे.

उद्दिष्टे :—

१) विविध आपत्तींचे आकलन विद्यार्थ्यांना करून देणे.
२) आपत्ती टाळण्यासाठी माहितीचे विविध स्त्रात विद्यार्थ्यांना माहिती करून देणे.
३) अटळ आपत्तींना सामोरे जाण्याची तयारी करणे.
४) आपत्तीनंतर बचाव कार्य व मदत कार्य वेगाने व सूत्रबध्दवणे करण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे याकरिता तज्ज्ञांकरवी विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे
५) आपत्ती व्यवस्थापनांतून सामाजिक बांधिलकीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निमार्ण करणे.
६) आपत्ती येण्यापूर्वी त्या येऊ नयेत म्हणून पूर्वतयारीबाबत विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे.
७) महाविद्यालयीन स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कक्ष करणे.
८) आपत्ती व्यवस्थापन कायद्यांची व नियमांची माहिती महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना करून देणे.
९) आपत्तींच्या प्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून स्वयंस्फूर्तीने सहभाग घेणे.
१०)आपत्ती व्यवस्थापनात प्रशासनास योग्य ते सहकार्य करणे.

**योजनेसाठी पात्रता :—**

आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण ही योजना गोंडवाना विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालया मधून उच्चशिक्षण घेणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांसाठी आहे.

**योजनेसाठी अनुदान :—**

सदर योजनेअंतर्गत ४ ते ५ महाविद्यालयांचा गट करून एकत्रित १०० विद्यार्थ्यांचे दोन दिवसांचे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करावयाचे असल्याने ज्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी या शिबिराचे आयोजन करण्यात येईल, त्या आयोजक महाविद्यालयाला विद्यापीठाकडून रु. १५,०००/— अर्थसहाय्य देण्यात येईल.

सदर अनुदानातून खालीलप्रमाणे खर्चास मान्यता देण्यात येईल :

| | |
|---|---|
| १. आयोजन खर्च ( चहा, नाष्टा, भोजन, साधनसामग्री इ.) | रु. १०,०००/— |
| २. तज्ज्ञ व्यक्तींचे मानधन : | रु. ३,०००/— |
| ३. आकस्मिक व इतर खर्च यंत्रे / साहित्य व वाहतुक : | रु. २,०००/— |
| एकूण : | रु. १५,०००/— |

**प्रस्ताव दाखल करण्याची पध्दत :—**

आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी ४ ते ५ महाविद्यालयांचा गट इच्छुक आयोजक महाविद्यालय तयार करेल किंवा संचालक विद्यार्थी विकास एका आयोजक महाविद्यालयाची निवड करतील. निवड झालेल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास अधिकाऱ्याने कृतिसत्रासाठी प्रस्ताव दाखल करावयाचा आहे. याकरिता आवश्यक असलेला विहित नमुन्यातील अर्ज सोबत जोडला आहे. तो पूर्णपणे भरून आवश्यक त्या कागदपत्रांसह मा. संचालक, विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या कार्यालयाकडे ३० सप्टेंबर पूर्वी पाठवावा. निर्धारित तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाचा मान्यतेसाठी विचार केला जाणार नाही.

**योजनेची कार्यवाही :—**

सदर योजना विद्यार्थी विकास विभागाने ठरवून दिलेल्या ४ ते ५ महाविद्यालयांच्या समूहाने एकत्रितरीत्या राबवायची आहे. याकरिता संबंधित महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास अधिकाऱ्याने संचालक विद्यार्थी विकास यांचेशी विचारविनिमय करून कार्यक्रमाचे नियोजन करावे. गटातील प्रत्येक महाविद्यालयाच्या २० विद्यार्थी— विद्यार्थीनींची या कृतिसत्रासाठी निवड करताना प्रथम वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांनाच प्राधान्य द्यावे. प्रत्येक महाविद्यालयाच्या २० याप्रमाणे ८० ते १०० विद्यार्थी विद्यार्थीनीचे दोन दिवसीय प्रशिक्षण कृतिसत्र गटातील विद्यार्थ्यांनी निश्चित केलेल्या महाविद्यालयात आयोजित करावे.

कृतिसत्रात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवास खर्च त्यांच्याच महाविद्यालयाने करावयाचा आहे. प्रशिक्षणासाठी तज्ज्ञांना निमंत्रित करण्यात यावे. व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या स्थानिक पातळीवरील तज्ज्ञांना प्राधान्य देण्यात यावे. जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून याबाबत आवश्यक ते मार्गदर्शन घ्यावे. प्रशिक्षण कार्यक्रम संपूर्ण दोन दिवसांचा स. १० ते सांय. ५ या वेळेत घेण्यात यावा.

**या कृतिसत्रासाठी खालील विषयांच्या प्रशिक्षणाचा समावेश असावा :—**

१) आपत्ती व आपत्कालीन व्यवस्थापन.
२) भूकंप व त्सुनामी.
३) वीज आणि वादळे.
४) पुर आणि आग.
५) औद्योगिक व रासायनिक दुर्घटना.
६) दुष्काळ.
७) प्रथमोपचार.
८) आपत्तिपश्चात तणाव व्यवस्थापन.

वरीलपैकी किमान चार विषयांच्या प्रशिक्षणाचा अंतर्भाव कृतिसत्रात असावा. प्रशिक्षण तज्ज्ञांमार्फत देण्यात यावे व प्रशिक्षण देताना विद्यार्थ्यांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. प्रशिक्षण कार्यक्रम संपल्यानंतर त्याचा विस्तृत अहवाल फोटोसह तयार करावा. कृतिसत्रात सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयनिहाय हजेरी — पत्रक ठेवण्यात यावे.

## अहवाल व हिशेब सादर करण्याची पध्दत :

अ) दरवर्षी फेब्रुवारी अखेरपर्यंत या योजनेअंतर्गत कृतिसत्र आयोजित करावे.

ब) कृतिसत्रात सहभाग घेतलेल्या महाविद्यालयांची यादी.

क) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कृतिसत्रात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे मुळ हजेरी—पत्रक (झेरॉक्स नको) सादर करावे.

ड) हिशेब कोणत्याही परिस्थितीत त्या त्या वर्षाच्या १० मार्चपर्यंत पाठवावेत.

## हिशेब सादर करताना पुढील कागदपत्रांची पूर्तता करावी:

१) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेचे मान्यतापत्र.

२) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेचा अहवाल (फोटोंसह).

३) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेसाठी झालेल्या खर्चाच्या मूळ पावत्या (झेरॉक्स नको).

४) हिशेब सादर करताना विवरणपत्रावर प्राचार्य व विद्यार्थी कल्याण अधिकारी (D.S.D.) यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

५) दोन दिवसांच्या कृतिसत्राची तपशीलवार कार्यक्रमपत्रिका.

नियमावलीत योग्य ते बदल करण्याचे अधिकार मा. संचालक, विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्याकडे असतील.

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

## विद्यार्थी विकास विभाग,

### महाविद्यालयीन स्तरावरील आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण, २०   —२०   साठी प्रस्ताव

१) महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ..........................................................................

२) महाविद्यालय स्थापनेचे वर्ष : ..........................................................................

३) प्राचार्यांचे नांव : ..........................................................................

४) विद्यार्थी विकास अधिकाऱ्याचे नांव व मोबाईल क्र. : ....................................................

५) महाविद्यालयातील एकूण प्राध्यापकांची संख्या : ....................................................

६) महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी संख्या : ..........................................................

७) महाविद्यालयातील एकूण शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संख्या : ............................................

८) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेअंतर्गत गटातील अन्य महाविद्यालयांची माहिती:....................

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव व पत्ता | विद्यार्थी विकास अधिकाऱ्याचे नांव |
|---|---|---|
| १. | ........................................ | ........................................ |
| २. | ........................................ | ........................................ |
| ३. | ........................................ | ........................................ |
| ४. | ........................................ | ........................................ |
| ५. | ........................................ | ........................................ |

९. सन २०   —२०   या शैक्षणिक वर्षात सदर योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा संभाव्य खर्चाचा आढावा.

१)

२)

१०. आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून द्यावयाच्या प्रशिक्षणासाठी स्थानिक प्रशिक्षक उपलब्ध आहेत काय?   होय / नाही

११. आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कृतिसत्रासाठी महाविद्यालयाकडे उपलब्ध असलेल्या सुविधा:

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

विद्यार्थी विकास अधिकारी (D.S.D.)
स्वाक्षरी व शिक्का

महाविद्यालयाचा
शिक्का

प्राचार्य
स्वाक्षरी व शिक्का